महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.७६/एसएम-२ दिनांक:- ०१ डिसेंबर, २०२१

## मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
नारायणा एज्युकेशन ट्रस्ट,आय.सी.कॉलनी, बोरीवली(प.) मुंबई ४००१०३.

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टक्नो स्कुल, स.नं.२२/१ व २३/३ए,३ब,४ गंधारे गाव, ता.कल्याण, जि.ठाणे.**

संदर्भ- १. मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.७६/एसएम-२, दिनांक १८.११.२०२१.
२. सचिव/अध्यक्ष, नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई यांचे दि.२२.११.२०२१ चे पत्र

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टक्नो स्कुल, स.नं.२२/१ व २३/३ए,३ब,४ गंधारे गाव, ता.कल्याण, जि.ठाणे या शाळेस (प्राथमिक ते माध्यमिक, इ.१ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम,राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्यास संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये मान्यता पत्र देण्यात आले आहे. सदर मान्यता पत्रातील मंडळ संलग्नता **"राज्यमंडळ ऐवजी सी.बी.एस.ई."**असे वाचावे.

प्र.सु.पडोळे
(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -
१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.मुंबई ,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे.
७. निवड नस्ती एस एम २ (७६/२१).

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

2022

03AA 558912

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

20 JUN 2022

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

जिल्हा कोषागार कार्यालय ठाणे

NOTARY GOVT. OF INDIA
ADV. ROHAN T. GAIKWAD
Kalyan
Dist. Thane
Maharashtra
Reg. No. 15183

0346/0

23 JUN

जोडपत्र ५
फक्त प्रतिज्ञापत्रासाठी

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक .................... दिनांक ........

विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता...... K.G. SAWANT [B.A.LL.M]
ADVOCATE HIGH COURT
B-5, Alka CHS, Sion-22

........................................ सही

मुद्रांक विक्रेत्याची सही (सौ. स्नेहल सं. कुडतलकर) ..................

मुद्रांक विक्रीचे ठिकाण : साईसमृध्दी टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर, दुकान नं. १, श्रीराम अपार्टमेंट, यशोधन नगर, ठाणे (पश्चिम)

मुद्रांक परवाना क्रमांक : १२०१०१४

---

(ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

Government of Maharashtra
Department of School Education and Sports,
Ministry (Extension), Hall No. 432,
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32.

Telephone No:

Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

No.: - SFS-1021 / S.No.76 / SM-2

Date: - December 01, 2021

Certificate of accuracy

Per, Chairman / Secretary,
Narayana Education Trust, i. C. Colony, Borivali (W) Mumbai 400103.

Subject - Recognition letter under Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012 for starting new schools on self-financing basis or for upgrading existing schools

...

Narayana Education Trust, Mumbai operated Narayana E-Techno School, S.No. 22/1,2 and 23/3A, 3B, 4 Gandhare village, Tal. Kalyan, Dist. Thane.

References- 1. Certificate No. SFS-1021 / Pr.No.76 / SM-2, dated 18.11.2021.
2. Secretary / Chairman, Narayana Education Trust, Mumbai Letter dated 22.11.2021

Under the Maharashtra Self Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, Narayana Education Trust, Mumbai operated Narayana E-Techno School, S.No. 22/1,2 and 23/3A, 3B, 4 Gandhare village, Tal. Kalyan, Dist. Recognition letter has been issued to Thane School (Primary to Secondary, 1st to 10th, English Medium, State Board) for starting new school on self-help basis by letter No. 1 in reference. The board affiliation in the letter of recognition should be read as "CBSE instead of State Board"

(Pradip Padole)
Room Officer, Government of Maharashtra.

For copy information –

1. Commissioner, Education, State of Maharashtra, Pune.
2. State Project Director, Maharashtra Primary Education Council. Mumbai,
3. Director, (Secondary & Higher Secondary), State of Maharashtra, Pune.
4. Director (Primary), State of Maharashtra, Pune.
5. Divisional Deputy Director of Education, Mumbai Division, Mumbai.
6. Education Officer (Primary / Secondary and Higher Secondary), Zilla Parishad, Thane
7. Selection Nasti SM2 (76/21)

ATTESTED BY
ROHAN T. GAIKWAD
B.L.S., LL.B.
ADVOCATE & NOTARY
Government of India
Kalyan, District Thane.
Reg. No. 15183

18 JUL 2022

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.७६/एसएम-२ दिनांक:- १५ नोव्हेंबर, २०२१

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
**नारायणा एज्युकेशन ट्रस्ट,आय.सी.कॉलनी, बोरीवली(प.) मुंबई ४००१०३.**

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई **संचलित नारायणा ई-टक्नो स्कुल, स.नं.२२/१ व २३/३ए,३ब,४ गंधारे गाव, ता.कल्याण, जि.ठाणे.**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.७६/एसएम-२, दिनांक १५.०४.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून **नारायणा ई-टक्नो स्कुल, स.नं.२२/१ व २३/३ए,३ब,४ गंधारे गाव, ता.कल्याण, जि.ठाणे (प्राथमिक ते माध्यमिक, इ.१ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई संचलित **नारायणा ई-टक्नो स्कुल, स.नं.२२/१ व २३/३ए,३ब,४ गंधारे गाव, ता.कल्याण, जि.ठाणे (प्राथमिक ते माध्यमिक, इ.१ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि

या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.मुंबई ,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे.
७. निवड नस्ती एस एम २ (७६/२१).

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 03AA 558911

कोषागार कार्यालय ठाणे

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

20 JUN 2022

NOTARY ADV. ROHAN T. GAIKWAD Kalyan Dist. Thane Maharashtra Reg. No. 15183 EX DT. 22-10-2024 GOVT. OF INDIA

NOTARY ADV. ROHAN T. GAIKWAD Kalyan Dist. Thane Maharashtra Reg. No. 15183 GOVT. OF INDIA

दस रुपये TEN RUPEES

034609 23 JUN 20

जोडपत्र १
फक्त प्रतिज्ञापत्रासाठी

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक ........ दिनांक ........

विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता....... K. G. SAWANT [B.A.LL.M.]
ADVOCATE HIGH COURT
B-3, Alka CHS, Sion-22.

मुद्रांक विक्रेत्याची सही (सौ. स्नेहल सं. कुडतलकर) ..........

मुद्रांक विक्रीचे ठिकाण : साईसमृध्दी टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर,
दुकान नं. १, श्रीराम अपार्टमेंट, यशोधन नगर, ठाणे (पश्चिम)

मुद्रांक परवाना क्रमांक : १२०१०१४

(ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी
मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

Government of Maharashtra
Department of School Education and Sports,
T Ministry (Extension), Hall no. 432,
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32

Telephone no G Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

No.: - SFS-1021 / Pr.No.76 / SM-2 Date: November 15, 2021

**Letter of recognition**

Per,
Chairman / Secretary,
Narayana Education Trust, i. C. Colony, Borivali (W) Mumbai 400103.

**Subject**: Approval letter under Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 for starting new schools on self-financed basis or for upgrading existing schools ...

Narayana Education Trust, Mumbai operated Narayana E-Techno School, S.No. 22/1,2 & 23/3A, 3B, 4 Gandhare village, Tal. Kalyan, Dist. Thane.

**Reference** - Letter of Intent No. SFS-1021 / Pr.No.76 / SM-2, dated 15.04.2021.

Under the Maharashtra Self Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, Narayana Education Trust, Mumbai has started Narayana E-Techno School, S.No. 22/1,2 & 23/3A, 3B, 4 Gandhare village from Ta. Kalyan, Dist. Thane (Primary to Secondary, 1st to 10th, English Medium, State Board) had submitted an application for starting a new school on self-help basis.

2. With reference to your application, Narayana Education Trust, Mumbai operated Narayana E-Takno School, S.No. 22/1,2 & 23/3A, 3B, 4 Gandhare village, Tal. Kalyan, Dist. Letter of Intent was given to Thane (Primary to Secondary, 1st to 10th, English Medium, State Board) to start construction of school on self-help basis, with terms and conditions. Approval to start this school is now being given subject to the following

**terms and conditions**:

: 1) The proposed schools, all the standards, terms and conditions prescribed by the Right to Free and Compulsory Education of Children Act, 2009 and the Right to Free and Compulsory Education of Children, 2011 and the standards or norms specified by the Government from time to time. Will meet the terms and conditions.

2) All standards, terms and conditions prescribed by the registered organization or trust or company, as prescribed by the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and Under this Act, it is mandatory to abide by the directions given by the Government or the standards or conditions and conditions specified by the Government from time to time.

3) CBSE Or c. Income. S. C. E. Or C.A.I. E. Or i.B. Etc. of the board School managements wishing for affiliation, as directed by the Government from time to time, Obtaining a no-objection certificate from the government is mandatory.

4) The school management will inform the concerned district education officer before starting the academic year approved by the government.

5) Permission granted to establish a new school or to upgrade a school under the provisions of this Act, for the same academic year for which it has been sanctioned. Will be.

6) If the school management fails to start the school within 18 months, the letter of approval will be canceled.

7) School management, approved medium of instruction, school location, in future, cannot be changed without government permission.

8) If the school management has established a school in a place other than the place approved by the government, then the permission of that school will be revoked.

9) Provision has been made for teachers and non-teachers in self-financed schools Employees should be recruited in accordance with the prevailing rules and regulations of the government.

10) While filling district wise information, the school which has been given permission will fill in the information as "Self Help School" as a separate category and U.D. Income. S. Etc. Will get the number. In this regard, the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as the nodal officer.

11) The school management shall put up a sign at the entrance of the school premises saying "Self-financed licensed schools".

12) Violation of the provisions of any or any of the rules made under this Act Or any instructions given under the Act or as may be specified by the Government from time to time Failure to comply with standards or norms or terms and conditions The State Government may, at any time, revoke the letter of accreditation for any reason.

**For copy information**

1. Commissioner, Education, State of Maharashtra, Pune.
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai,
3. Director, (Secondary & Higher Secondary), State of Maharashtra, Pune.
4. Director, (Primary), State of Maharashtra, Pune.
5. Divisional Deputy Director of Education, Mumbai Division, Mumbai.
6. Education Officer (Primary / Secondary & Higher Secondary), Zilla Parishad, Thane.
7. Selection Nasti SM2 (76/21)

ATTESTED BY
ROHAN T. GAIKWAD
B.L.S., LL.B.
ADVOCATE & NOTARY
Government of India
Kalyan, District Thane.
Reg. No. 15183

JUL 2022

## नमुना दोन

जाक्र ठाजिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/
शिक्षण विभाग (प्राथमिक )
जिल्हा परिषद, ठाणे
दिनांक :- ०२/०६/२०२२

प्रति,

व्यवस्थापक :- नारायणा एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई
दुरध्वनी :- ९८७०१९३६७२
ई मेल :- mumkalyan.etechno@narayanagroup.com

**विषय:** - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**संदर्भ** :- प्रशासन अधिकारी कल्याण डोंबिवली मनपा, शिक्षण विभाग, कल्याण यांचेकडील प्रस्ताव

आपल्या दिनांक ३०/५/२०२२, रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला/ पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद ठाणे दि.**१/४/२०२२** पासुन ते **दिंनाक ३१/३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इ. १ ली ते इ. ८ वी** करिता नारायणा ई-टक्नो स्कुल, (CBSE) स.नं.२२/१ व २३/३ए, ३ब, ४ गंधारे गांव ता.कल्याण जि.ठाणे (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना ,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निदिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या को०१णत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांक/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या का लावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-:

| | |
|---|---|
| * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :- ४४३४ चौ.मि. |
| * एकुण बांधकाम क्षेत्र | :- ३५०० चौ.मि. |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- ८५० चौ.मि. |
| * वर्ग खोल्या संख्या | :- २८ |
| * कार्यालय- नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली | :- १८ |
| * मुलांसाठी व मुलींसाठीह स्वतंत्र प्रसाधनगृहे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- | :- आहे |
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | :- आहे |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | :- लागूनाही |
| * अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता | :- आहे |
| * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | :- आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक TH- KDMC-P- ___ असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२०. मुख्याध्यापक नारायणा ई-टक्नो स्कुल, (CBSE) स.नं.२२/१ व २३/३ए, ३ब, ४ गंधारे गांव ता.कल्याण जि.ठाणे यांनी त्यांच्या शाळेस आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर२-मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रके बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रके आढळून आल्यास या कार्यालयाकडुन देण्यात आलेले आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर-२ रद्द समजण्यात यावे.

**(डॉ.भाऊसाहेब कारेकर)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद ठाणे**

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 03AA 558910

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

2 0 JUN 2022

मुद्रांक प्रमुख लिपिक

NOTARY
ADV. ROHAN T. GAIKWAD
Kalyan
Dist. Thane
Maharashtra
Reg. No. 15183
EX DT. 22 10 2024
GOVT. OF INDIA

NOTARY
ADV. ROHAN T. GAIKWAD
Kalyan
Dist. Thane
Maharashtra
Reg. No. 15183
GOVT. OF INDIA

TEN RUPEES

FIVE RUPEES

23 JUN 20

जोडपत्र १

फक्त प्रतिज्ञापत्रासाठी

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक 034608 .................. दिनांक ..........

विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता....K. G. SAWANT (B.A.LL.M.)

ADVOCATE HIGH COURT

B-6, Alka CHS, Sion-22

...........................................................................

मुद्रांक विक्रेत्याची सही (सौ. स्नेहल स. कुडतलकर) ..................

मुद्रांक विक्रीचे ठिकाण : साईसमृध्दी टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर,

दुकान नं. १, श्रीराम अपार्टमेंट, यशोधन नगर, ठाणे (पश्चिम)

मुद्रांक परवाना क्रमांक : १२०१०१४

...........................................................................

(ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी

मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

Sample Two

Jakr Thajip / Shikshan / Prath / Pras- 2/CV684/22
Education Department (Primary)
Zilla Parishad, Thane
Date: - 02/08/2002

Per, Manager: - Narayana Education Trust, Mumbai
Telephone: 9870193672
E-mail: mumkalyan.etechno@narayanagroup.com

**Subject:** For the purpose of Section 18 of the Right to Free and Compulsory Education of Children Act, 2009, regarding the issuance of recognition certificates to schools under Rule 11, Rule 11 (4) of the Right to Free and Compulsory Education of Children Rules, 2011.

**References:** - Proposal from Administrative Officer Welfare Dombivali Municipal Corporation, Education Department, Kalyan In relation to your application

dated 30/5/2022, and after that with the school in this regard / Based on correspondence / school inspection.

I Education Officer (Primary) Zilla Parishad Thane . For a period of three years from 1/4/2022 to 31/3/2025. 1st to 8th . Narayana E-Techno School for 8th, (CBSE) S.No. 22/1,2 & 23/3A, 3B, 4 Gandhare village tal. Kalyan Dist. Thane (with school name, address) is giving temporary approval to the school. The above recognition is subject to the fulfillment of the following conditions.

1. The period of accreditation will not be extended and there will be no obligation under any circumstances to grant accreditation or affiliation after Class VIII.

2. The school will abide by the provisions of the Right to Free and Compulsory Education for Children Act 2009 (Annexure One) and the Maharashtra Right to Free and Compulsory Education for Children Rules 2011 (Annexure Two).

3. The school will admit children from the nearest weaker sections and disadvantaged groups in the first class up to a minimum of 25% of the number of students in that class and provide them free and compulsory education till the completion of elementary education.

4. For the children specified in paragraph 3, the school will be given a separate bank account for reimbursement as per section 12 (2) of the Act.

5. The institution / school will not charge any capitation fee. And for any scrutiny method Will not force his or her parents or guardians.

6. No child shall be denied admission to a school for reasons of religion, caste or ethnicity, place of birth or any of these, for lack of proof of age.

7. (I) No child admitted to a school shall be held in the same class in which he is. Or will not be expelled from school until the completion of elementary education.
(II) No child shall be subjected to corporal punishment or mental torture.
(III) Any child must pass any board examination till completion of elementary education Will not be.
(IV) Every child who has completed elementary education will be given a certificate prescribed under Rule 23.
(V) Students with disabilities / special needs will be included as per the provisions of the Act.
(VI) Teachers with minimum qualifications prescribed under section 23 (1) of the Act shall be appointed. However, teachers who do not have a minimum qualification on the date of commencement of the Act will have to acquire such a minimum qualification within a period of 5 years.
(VII) The teacher shall perform his / her duties specified in section 24 (1) of the Act and
(VIII) the school shall ensure that the teacher / s should not engage himself in private tutoring activities

8. Follow the curriculum prepared on the basis of the syllabus prescribed by the school appropriate authority. Will give access

9. Students as compared to the facilities available in the school as prescribed in section 19 of the Schools Act

10. The school shall comply with the standards and norms specified in section 19 of the Act. The facilities available at the school at the time of the previous inspection were as follows-:

* Area of the school premises : - 4434 sq.m.
* Total construction area : - 3500 sq.m.
* Playground area : 850 sq.m.
* Number of class rooms : - 28
* Office-Ni-Bhandar-Ni-Headmaster's Room : - 18
* There will be enough water to use separate toilets for boys and girls and to keep the toilets clean and healthy. : - Yes
* Drinking water facility : - Yes
* Kitchen for cooking lunch : - Not applicable
* Availability of Teaching Materials / Sports and Sports Materials / Library: - Yes
* Reading material readily available. : - Yes

11. Unauthorized classes or units may not be conducted on the school premises or elsewhere in the name of the school.

12. A school building or other construction or playground is for educational and skill development purposes only Will be used

13. The School Society Registration Act 1860 (21 of 1860) is being run by an organization registered under the Mumbai Public Trust System Act 1950. Other

14. The school is for the benefit of any individual group or individual or any other person or Not run for profit.

15. The school accounts should be audited and certified by a chartered accountant and appropriate account statements should be prepared as per rules. One copy of each return should be sent to the District Education Officer every year.

16. The accreditation code received by your school is TH-KDMC-P-1, any of this office Please note that in correspondence it should be mentioned.

17. The school should submit the report and information as requested by the Director of Education / District Education Officer from time to time Or to follow the instructions given by the government or the local authority for the continuous fulfillment of the condition of accreditation of the school or to rectify the errors in the functioning of the school.

18. If there is any registration of the organization, it should be renewed.

19. Other terms are attached herewith as per Annexure 3.

20. Headmaster Narayana E-Techno School, (CBSE) S.No. 22/1,2 & 23/3A, 3B, 4 Gandhare village tal. In case of any complaint regarding the documents submitted by Kalyan Dist. Thane to his school along with the proposal for obtaining RTE Recognition Form No. 2 or if any false and misleading documents are found, the RTE Recognition Form No. 2 issued by this office should be deemed canceled.

(Dr. Bhausaheb Karekar)

Education Officer (Primary)

Zilla Parishad Thane

NOTARY ADV. ROHAN T. GAIKWAD Kalyan Dist. Thane Maharashtra Reg. No. 15183 GOVT. OF INDIA

ATTESTED BY

ROHAN T. GAIKWAD
B.L.S., LL.B.
ADVOCATE & NOTARY
Government of India
Kalyan, District Thane.
Reg. No. 15183

- 8 JUL 2022